# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - संगीत सप्तसूर
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. किशोरी शंकर पाटील

---

विश्वाचा पहिला ध्वनी
स्वयंभू ॐकार
अनाहत नाद निर्मिती
सुरांना मिळे आकार

सा रे ग म प ध नी सा
संगीताचे सप्तसूर
संगीता शिवाय
जीवन होईल बेसूर

सरस्वतीची विणा
शंकराचा डमरू
श्रीकृष्णाची बासरी
असो नर्तकीचे घुंगरू

मृदुंग, टाळ, चिपळ्या
घेऊन वारकरी हातात
मुखी अभंगाचे बोल
नाचती  एका तालात

संस्कृतीची नाळ
संगीताशी जोडलेली
विविध भाषा, प्रांत
एका सुरात बांधलेली

Anahat Music Therapy

# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

गीत संगीत करता
आयुष्यातून वजा
जगणे नीरस होईल
निघून जाईल मजा

संगीत साधनेने
आत्मिक समाधान
मनःशांती लाभते
भारतीय संगीत महान

Anahat Music Therapy